राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.७०१५/२०२६

श्रीमती कमलप्रभा धमण
19/2, कल्याण निवास ऑपो लेक,
एन.एस. मंकिकर रोड, शीव (पूर्व),
मुंबई-400 022.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
सायन विभाग, मुंबई-४०००१९.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-4,
माटुंगा पोलीस ठाणे, डॉ.बी.आंबेडकर रोड,
माटुंगा, मुंबई – ४०० ०१९.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०८.२०२६

अपीलकर्ता	:	उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	उपस्थित/अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
१३.१२.२०२४	२८.०१.२०२५	२७.०२.२०२५	१७.०३.२०२५

अपिलार्थीनी दाखल केलेला दिनांक २५.०९.२०२४ रोजीच्या मूळ तक्रार अर्जावर तसेच उपरोक्त तक्रार अर्जावर झालेली कार्यवाही बाबत दिनांक १३.१२.२०२४ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त / जन माहिती अधिकारी सायन पोलीस स्टेशन येथे एकूण तीन मुद्यांची माहिती मागितली असून अपिलार्थीनी तक्रार केलेली व्यक्ती म्हणजेच श्री.हितेन दहिसरीया यांच्याविरुद्ध एकूण तीन मुद्यांची माहिती मागितलेली आहे. यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांनी दिनांक १४.०१.२०२५ रोजी अपिलार्थीना माहिती अधिकार अंतर्गत एकूण **सात मुद्यांवर खालीलप्रमाणे प्रतिसाद दिला आहे:-**

विषय :- आपल्या दिनांक 25/09/2024 रोजीच्या तक्रार अर्जाबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, आपण दिनांक 25/09/2024 रोजी केलेला तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी शींव पोलीस ठाणेस प्राप्त झालेला आहे.

आपण दिलेल्या तक्रारीवरून श्री हितेन दहिसरीया यांचे विरूध्द शीव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. 541/2021, कलम 354(अ), 509 भा.दं. वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण करून तपासी अधिकारी यांनी सदर गुन्हयाचे दोषारोप PW/५१०१९७८/२०२२ अन्वये मा. 51 वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांचे न्यायालयात दाखल करण्यात आलेले असुन सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) दिनांक- 02/04/2024 रोजी आपण पाण्याच्या तक्रारी संदर्भात अर्ज केलेला असुन सदर अर्जाची चौकशी पो. उप नि. शिवतरे हे करीत होते. सदर अर्जामध्ये आपण नळामधुन कमी दाबाने पाणी येत असल्याबाबत नमुद केले असुन, सदरची बाब ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येते. सबब आपला अर्ज जा.क्र. // x 7633/2024, दिनांक 13/12/2024 अन्वये मा. सहाय्यक आयुक्त, एफ नॉर्थ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, माटुंगा, मुंबई यांना पाठविण्यात आलेला असुन आपण बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संपर्क साधावा.

श्री.हितेन दहिसरीया यांनी त्यांचे विरूध्द केलेली विनयभंगाची तक्रार मागे घेण्यासाठी सन 2023 मध्ये धमकी दिली म्हणून आपण दिलेल्या तक्रारीवरून अदखलपात्र गु.र.क्र. 574/2024, कलम 427, 506 भा.दं. वि. अन्वये पो.उप नि. शिवतरे यांनी नोंद केला आहे.

आपण यापुर्वी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सविस्तर माहिती मसपोनि क्रांती पाटील यांनी जा.क्र. 5805/2022, दिनांक- 15/8/2022 व जा.क्र. 196/2023, दिनांक- 10/01/2023 अन्वये आपणास कळविण्यात आलेली आहे.

सबब आपण केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आपणास वेळोवेळी उपरोक्त प्रमाणे सविस्तर माहिती कळविण्यात आलेली असुन, आपण श्री.हितेन दहीसरीया यांचेवर केलेल्या आरोपांच्या अनुषंगाने शीव पोलीस ठाणेस योग्य ती कायदेशीर दखल घेवुन कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सबब आपण एकाच विषयाशी संबंधीत वारंवार तक्रार अर्ज करीत असल्याने आपला सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे याची नोंद घ्यावी.

तसेच अपिलार्थीच्या मूळ जोडपत्राप्रमाणे दिनांक २८.०१.२०२५ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सायन विभाग, मुंबई यांनी अपिलार्थीना श्री.जगताप सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, शीव पोलीस ठाणे यांच्याकडून प्राप्त निवेदनानुसार प्रतिसाद दिलेला आहे.

अपिलार्थीना दिलेल्या प्रतिसादाने शीव पोलीस ठाणे सहाय्यक आयुक्त एफ/नॉर्थ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना अपिलार्थी यांच्याकडून प्राप्त तक्रार अर्जावर बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित विषयाबाबत तक्रार अर्ज अग्रेषित देखील केलेला आहे. या विरुद्ध अपिलार्थीनी दिनांक २७.०२.२०२५ रोजी पोलीस उपायुक्त परिमंडळ-४ येथे प्रथम अपील अर्ज दाखल केला असून यावर दिनांक १७.०३.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली. तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ-४ यांनी अपिलार्थी

तसेच जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर मूळ अर्जाच्या संबंधित उत्तर अपिलार्थीना सात दिवसाच्या आत पुरवून अनुपालन अहवाल सादर करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढलेला आहे.

उपरोक्त आदेशाचा अनुपालन दिनांक ३१.०३.२०२५ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दिला असून क्रमांक एक ते तीन या संदर्भात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ही अपिलार्थीना प्रदान करण्यात आलेली आहे. याविरुद्ध अपिलार्थीनी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज हा दिनांक १०.०६.२०२५ रोजी दाखल केला असून अपिलार्थी या वरिष्ठ नागरिक असल्याने उपरोक्त अपील अर्ज हा प्राधान्याने सुनावणीस घेण्यात आलेला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ तक्रार अर्जावर करण्यात आलेली प्रशासकीय पातळीवरची कार्यवाही, तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेला प्रतिसाद, सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांनी याबाबतीत प्रशासकीय पातळीवर **कलम ५ (४) ५ (५)** अन्वये सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून केलेली कृती, त्यावर जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रदान केलेला परिपूर्ण प्रतिसाद व तत्कालीन अपिलीय अधिकाऱ्यांच्या दिनांक १७.०२.२०२५ रोजी च्या सकारात्मक आदेशात दिलेल्या निर्देशांचे तात्काळ करण्यात आलेले अनुपालन इत्यादी बाबी लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असून प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

अपिल क्र.७०१५/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १८-०८-२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**